ePaper
कीर्तिकरांवर कारवाई अटळ? लोकसभेच्या निकालाआधीच शिंदे 'निक्काल' लावणार!

║ वर्ष - 7 ।अंक - 337 ║ UDYAM-MH-26-0158827 ║

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | मंगळवार, दिनांक 28 मे 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews



## आतील पानांत


- ५ हजार घरांना 'ऑन दी स्पॉट' दिलासा!
- बारामती, कल्याण, ठाणे कोण जिंकणार?
- शर्वरीच्या आयटम साँगने घातला धुमाकूळ
- पहिल्याच फेरीत नदाल गारद!


# पोर्शे अपघातानंतर पुन्हा पुणे हादरलं!

## ट्रकने महाविद्यालयीन तरुणांना चिरडले, 2 जणांचा मृत्यू, 1 जखमी

। पुणे । महाईन्यूज

**पुणेः बारामती लोकसभा मतदारसंघाची निवडणुकीच्या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे. या मतदारसंघात पवारविरुद्ध पवार, अशी लढत झाली. निकालाच्या धास्तीने उपमुख्यमंत्री अजित पवार गटातील स्थानिक नेत्यांची झोप उडाली आहे. मताधिक्य कमी झाल्यास अजित पवार यांच्या रडारवर येण्याची भीती नेत्यांमध्ये आहे. बारामतीमधील नेत्यांची ही अस्वस्थता चर्चेचा विषय ठरली आहे.**




पुण्यात पोर्शे अपघातानंतर आणखी एक मोठा अपघात झाला आहे. नगर रस्त्यावर खराडी जकात नाका येथे भरधाव ट्रकने दुचाकीला चिरडले. त्यात दोन महाविद्यालयीन तरुणांचा मृत्यू झाला आहे. हा अपघात रात्री साडेदहाच्या सुमारास झाला. चंदननगर जकात नाका येथे सिग्नल वर थांबलेल्या मोटरसायकला ट्रकने मागून जोरात धडक दिली. हे दोन महाविद्यालयीन युवक मूळचे लातूरचे असून ते सध्या वाघोली येथे शिक्षण घेत होते, अशी माहिती पोलिसांनी दिली.

मालवाहतूक ट्रक वाघोलीतून पुण्याच्या दिशेने येत होता यावेळी खराडीतील जकात नाका चौकात हा अपघात घडला. याप्रकरणी ट्रक ड्रायव्हरला ताब्यात घेण्यात आले आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. श्यामबाबू रामफळ गौतम असे चालकाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गौतम हा त्याचा ट्रक (MH 12 VF 6441) घेऊन चंदन नगरच्या दिशेने जात होता. जकात नाका येथे सिग्नल वर थांबलेल्या मोटरसायकला त्याने मागून जोरात धडक दिली. त्यामध्ये मोटरसायकल वरील असणारे ३ जणं फरफटत गेली. या अपघातात २ जणांचा मृत्यू झाला तर १ जणं जखमी आहे. आदिल शेख असे एका तरुणाचे नाव असून इतर दोघांचे नाव समजू शकलेले नाही. घटनास्थळावरून ट्रक चालक याला ताब्यात घेऊन त्याची ससून हॉस्पिटल येथे वैद्यकीय तपासणीसाठी नेले आहे. पुढील तपास पोलीस करत आहेत.

### पोर्शे अपघाताने देशात खळबळ

पुण्यातील रस्ते अपघाताची संख्या वाढत आहे. कल्याणी नगरमध्ये भरधाव वेगात आलेल्या पोर्शे कारने मोटारसायकलला धडक दिल्याने दोघांचा मृत्यू झाला होता. दारूच्या नशेत 17 वर्षीय अल्पवयीन कार चालवत होता. याप्रकरणी रोज नवनवीन खुलासे होत आहेत. आता पुणे पोलिसांनी अल्पवयीन मुलाच्या रक्ताच्या नमुन्याशी छेडछाड करून पुरावे नष्ट केल्याप्रकरणी दोन डॉक्टरांना अटक केली आहे.

# धनिकपुत्राला वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा

## येरवाडा पोलीस ठाण्यात पिझ्झा-बर्गर खायला दिला?

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुण्यातील कल्याणीनगर परिसरात पोर्शे कारने दोघांना चिरडणाऱ्या धनिकपुत्राला वाचवण्यासाठी येरवाडा पोलीस आणि ससून रुग्णालयातील (SASSOON HOSPITAL) डॉक्टरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केल्याची माहिती आता समोर येत आहे. 19 मे म्हणजे रविवारी पहाटे अडीचच्या सुमारास हा अपघात झाला. त्यावेळी या धनिकपुत्राला स्थानिक नागरिकांनी चोप देऊन पोलिसांच्या हवाली केले. त्यानंतर या मुलाला येरवाडा पोलीस ठाण्यात आणण्यात आले. त्याच्यावर गुन्हा दाखल केल्यानंतर त्याच्या शरीरातील मद्याचे प्रमाण तपासण्यासाठी त्याची तातडीने ब्लड टेस्ट होणे आवश्यक होते. मात्र, येरवाडा पोलिसांनी या धनिकपुत्राला अपघातानंतर तब्बल 18 तासांनी म्हणजे साधारण सकाळी 11 वाजता ससून रुग्णालयात ब्लड टेस्टसाठी नेले.**




एखाद्या गंभीर गुन्ह्यात आरोपीने मद्यप्राशन केल्याचा संशय असल्यास पहिल्या दीड तासात त्याच्या रक्ताचे नमुने घेतले जातात. जेणेकरुन त्याने मद्यप्राशन केले असल्यास ब्लड रिपोर्टमध्ये त्याची अचूक माहिती कळते आणि न्यायालयात हा महत्त्वाचा पुरावा ठरु शकतो. मद्यसेवन केल्यानंतर शरीरात 24 तास मद्याचे अंश राहतात. पण जितका वेळ जाईल तितक्या प्रमाणात शरीरातील मद्याचा अंश कमी होतो. परिणामी पुण्यातील धनिकपुत्राला वाचवण्यासाठीच येरवाडा पोलिसांनी त्याला जाणुनबुजून ससून रुग्णालयात उशीरा नेले का, या चर्चेने सध्या चांगलाच जोर धरला आहे.

### धनिकपुत्राला पिझ्झा-बर्गर खायला का

येरवाडा पोलीस ठाण्यात पुणे अपाघातामधील मुख्य आरोपी असलेल्या विशाल अग्रवाल यांच्या मुलाला विशेष वागणूक देण्यात आल्याची माहिती समोर आली होती. यावरुन बराच वादंग झाला होता. त्यानंतर येरवाडा पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले होते. या कर्मचाऱ्यांनी धनिकपुत्राला पोलीस ठाण्यात पिझ्झा-बर्गर खायला दिल्याचा आरोप झाला होता. अग्रवाल कुटुंबीयांनी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगीने मुलांसाठी बाहेरून पिझ्झा आणि बर्गर मागवला होता. एका झिरो पोलिसाने हे खाद्यपदार्थ मागच्या बाजूने पोलीस ठाण्यात नेले, अशी चर्चा आहे. पोलिसांनी धनिकपुत्राला दिलेल्या या रॉयल ट्रिटमेंटची बरीच चर्चा झाली होती. मात्र, आता यामागे वेगळेच कारण असल्याचा संशय आता व्यक्त केला जात आहे.

# आमदार रविंद्र धंगेकरांनी काढले उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांचे वाभाडे!

## रवींद्र धंगेकर, सुषमा अंधारे यांची पुणे एक्साईज कार्यालयात धडक

। पुणे । महाईन्यूज ।

**पुण्यातील अपघात प्रकरणानंतर शहरात अवैधरित्या चालणारे पब आणि ड्रग्जच्या मुद्द्यावरुन रान उठवणारे काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर आणि ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी सोमवारी पुण्यातील उत्पादन शुल्क विभागाच्या कार्यालयावर धडक दिली. या दोघांनी उत्पादन शुल्क विभागाचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना अक्षरश: धारेवर धरले. यावेळी उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी तुमचे सर्व आरोप साफ चुकीचे आहेत, असे म्हटले. त्यांच्या आरोपानंतर आमदार रवींद्र धंगेकर यांनी त्यांना फैलावर घेतले.**



तुम्ही खोटं बोलू नका. तुम्ही पापं करताय, तुम्हाला लय समजतं का, तुम्ही दर महिन्याला 70 ते 80 लाख हप्ता घेता, याची यादी माझ्याकडे. तुमचे कोण कोण लोक पैसे आणून देता, याची माहिती माझ्याकडे आहे. तुम्ही स्वत:ला शहाणे समजता का, तुम्ही पुणे उदध्वस्त केलं, तुम्हाला लाज कशी वाटत नाही?, अशा एकापाठोपाठ प्रश्नांची सरबत्ती रवींद्र धंगेकर यांनी केली.यावेळी रवींद्र धंगेकर यांनी हप्ते घेणाऱ्या पोलिसांची नावे वाचून दाखवली. कॉन्स्टेबल सुर्वे, पडवळ, बाळासाहेब राऊत, राहुल रामनाथ, सुप्रिटेंड चरणसिंह रजपूत हे तुमच्या आशीवार्दाने हप्ते घेतात. पुणे महानगरपालिकेची परवानगी नसेल तर पुण्यातील पब सकाळी चार वाजेपर्यंत कसे चालतात? आम्ही याचा जाब विचारण्यासाठी इथे आलो आहोत, असे रवींद्र धंगेकर यांनी उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांना सुनावले. आम्ही आता ही गोष्ट शांतपणे सांगायला आलो आहोत, यापुढे आम्ही तुम्हाला शांतपणे सांगणार नाही. आमच्याकडे तुमच्या सगळ्या गोष्टींची माहिती आहे, असा इशाराही रवींद्र धंगेकर यांनी दिला.

### हप्त्यांची यादीच वाचून दाखवली

पब आणि हॉटेल्सच्या हप्त्यांची यादीच वाचून दाखवली सुषमा अंधारे, धंगेकरांनी

द माफिया- 1 लाख रुपये
एजंट जॅक्स प्रत्येक आऊटलेटमागे प्रत्येकी 50 हजार रुपये
टू बीएचके- 1 लाख
बॉलर- २ लाख
राजबहादूर मिल्स बिमोरा- १ लाख
मिल्ट- १ लाख
टीटीएम रुफटॉप- ५ हजार
स्काय स्टोरी -५० हजार
जिमी दा ढाबा- ५० हजार
टोनी दा ढाबा- 50 हजार
आयरिश- ४० हजार
टल्ली टुल्स- ५० हजार
ॲटमोस्पिअर- 60 हजार
रुड लॉर्ड - ६० हजार
24 के- दीड लाख
कोको रिको हॉटेल- 71 हजार रुपये

### ठाकरे आणि काँग्रेसच्या शिलेदारांचा हल्लाबोल

पुणे अपघात प्रकरणानंतर काँग्रेस आमदार राज्य सरकारविरोधात रान उठवत आहेत. सोमवारी त्यांना ठाकरे गटाच्या सुषमा अंधारे यांची साथ मिळाली. सुषमा अंधारे यांनी उत्पादन शुल्क विभागाच्या कारभारावरुन महायुतीच्या मंत्र्यांना धारेवर धरले. पुण्यात दर 15 दिवसांनी गांजा आणि ड्रग्ज सापडत असेल तर उत्पादन शुल्क विभाग काय करतोय? संबंधित खात्याच्या मंत्र्यांचा अधिकाऱ्यांवर वचक नाही का? अधिकारी त्यांचे आदेश ऐकत नाहीत का?, असे सवाल विचारत सुषमा अंधारे यांनी मंत्री शंभुराज देसाई यांना लक्ष्य केले. आम्ही काही बोललो तर एक्साईज खात्याचे मंत्री आणि आरोग्य प्रशासन विभागाचे मंत्री आमच्यावर अब्रुनुकसानीचा खटला दाखल करण्याची भाषा करतात. आमच्यावर केस करण्यापेक्षा तुमच्या अधीन असणाऱ्या अधिकाऱ्यांना बोला, असे खडेबोल सुषमा अंधारे यांनी संबंधित मंत्र्यांना सुनावले.

---


# कमाल! सर्व विषयात 35 पेक्षा एक कमी ना एक जास्त

## न्यू इंग्लिश स्कूलचा प्रथमेश तुपसौंदरला प्रत्येक विषयात 35 गुण मिळाले

।पुणे ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने घेतलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल सोमवारी जाहीर झाला. या परीक्षेत 95.81 टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सर्वाधिक निकाल कोकण विभागाचा लागला असून या विभागातील ९९.०१ टक्के विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. तर सर्वात कमी निकाल नागपूर विभागाचा ९४.७३ इतका आहे. या परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत असताना पुण्यातील एक विद्यार्थी चर्चेत आला आहे.**





| SUBJECT CODE | SUBJECT NAME | MAR. OB. |
|---|---|---|
| 01 | MARATHI (1ST LANG) | 035 |
| 15 | HINDI (2/3 LANG) | 035 |
| 17 | ENGLISH (2/3 LANG) | 035 |
| 71 | MATHEMATICS | 035 |
| 72 | SCIENCE & TECHNOLOGY | 035 |
| 73 | SOCIAL SCIENCES | 035 |
| | TOTAL: | 175 / 500 |
| | PERCENTAGE: | £ 35.00 |

पुण्यातील टिळक रोड येथील न्यू इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी प्रथमेश तुपसौंदर याला प्रत्येक विषयात ३५ गुण मिळाले आहेत. प्रथमेशला ५०० पैकी १७५ गुण मिळाले आहेत. त्याला मराठी, हिंदी, इंग्रजी, गणित, विज्ञान आणि तंत्रज्ञान आणि सोशल सायन्स अशा सर्व विषयात प्रत्येकी ३५ गुण मिळाले आहेत.

दहावीच्या निकालात एकूण नोंदणी झालेल्या 1560154 पैकी 1549326 इतक्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली त्यापैकी 1484441 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मुलींचे उत्तीर्ण होण्याचे प्रमाण ९७.२१ टक्के तर मुलांचे प्रमाण ९४.५६ टक्के इतके आहे. गेल्यावर्षीच्या तुलनेत यावेळचा निकाल २.५६ टक्के अधिक लागला आहे. गेल्या वेळचा निकाल ९३.२३ टक्के इतका होता. १८ विषयांचा निकाल १०० टक्के असल्याचे बोर्डाने सांगितले. राज्यातील ९ हजार ३८२ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. यावेळी १ लाख ७८ हजार ८६५ विद्यार्थ्यांना अतिरिक्त गुण देण्यात आले आहेत.

यंदाच्या निकालामध्ये कोकण विभागानं बाजी मारली असून नागपूर विभाग मात्र तळाशी आहे. नागपूर विभाग 94.73 टक्क्यांसह राज्यातील विभागनिहाय टक्केवारीनुसार सर्वात खाली आहे. तर निकालांमध्ये पुन्हा एकदा मुलींनी बाजी मारली आहे. मुलींचा निकाल 97.21 टक्के तर मुलांचा निकाल 94.56 टक्के लागला आहे. आकडेवारीनुसार, सर्वच विभागांमध्ये मुलींनी बाजी मारली आहे. एकूण 72 विषयांपैकी 18 विषयांचा 100 टक्के लागला आहे. दरम्यान, दहावीच्या परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांच्या निकालाची एकूण टक्केवारी 94.86 टक्के इतकी आहे.

### टक्केवारीनुसार विभागीय मंडळ क्रमांक

क्रमांक १ : कोकण : ९९.०१ टक्के
क्रमांक २ : कोल्हापूर : ९७.४५ टक्के
क्रमांक ३ : पुणे : ९६.४४ टक्के
क्रमांक ४ : मुंबई : ९५.८३ टक्के
क्रमांक ५ : अमरावती : ९५.५८ टक्के
क्रमांक ६ : नाशिक : ९५.२८ टक्के
क्रमांक ७ : लातूर : ९५.२७ टक्के
क्रमांक ८ : छत्रपती संभाजीनगर : ९५.१९ टक्के
क्रमांक ९ : नागपूर : ९४.७३ टक्के

# 'रेड झोन'ची मोजणी झाल्यास

# 5 हजार घरांना 'ऑन दी स्पॉट' दिलासा!


## क्रीडा समितीचे माजी सभापती उत्तम केंदळे यांचा विश्वास

। पिंपरी-चिंचवड।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'रेड झोन'मुळे यमुनानगर आणि कृष्णानगरमधील ८० टक्के भाग प्रभावित आहे. २०१९ मध्ये टेन्टेटिव्ह लाईन घोषित केली होती. आता रितसर मोजणी आणि सर्व्हेक्षण झाल्यास या भागातील सुमारे ५ हजार घरे रेडझोनच्या हद्दीबाहेर होतील. तसेच, रेड झोनची हद्द तात्काळ प्रभावाने १५७ मीटर कमी होईल, असा विश्वास पिंपरी-चिंचवड महापालिका क्रीडा समितीचे माजी सभापती उत्तम केंदळे यांनी व्यक्त केला.**






पिंपरी-चिंचवडमधील बहुप्रतिक्षित 'रेड झोन' चा प्रश्न कायमस्वरुपी सोडवण्यासाठी २०१४ पासून भाजपा अमादार महेश लांडगे पाठपुरावा करीत आहेत. संरक्षण विभागाने नुकतीच रेड झोनच्या मोजणीसाठी 'एनओसी' दिली आहे. ही प्रक्रिया 'रेड झोन मुक्त पिंपरी-चिंचवड' च्या दृष्टीने पहिले पाऊल मानले जात आहे.

उत्तम केंदळे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाचे तत्कालीन अध्यक्ष सदाशिव खाडे आणि आमदार महेश लांडगे यांच्या सहकार्याने रेड झोनची हद्द मोजून द्यावी, अशी आग्रही मागणी केली होती. २०१९ मध्ये मोघमपणे हद्द मोजण्यात आली. त्यामुळे अजिंठानगर येथील 'जेएनएनयुआरएम'योजनेतील 'एसआरएस'चा प्रकल्प रेड झोनमधून बाहेर निघाला. २०१७ मध्ये या प्रकल्पासंदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. त्यानुसार २०१९ मध्ये टेन्टेटिव्ह मोजणी झाली. हा प्रकल्प रेडझोनमधून बाहेर आला. परंतु, कृष्णानगर सेक्टर २०, यमुनानगर सेक्टर २१, सेक्टर २२ आणि सेक्टर २३ ची हद्द अद्याप निश्चित नाही. परिणामी, रेड झोनची टांगती तलवार कायम आहे.

गतवर्षी पुणे जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये पुण्यात बैठक झाली. त्यावेळी आमदार महेश लांडगे यांनी रेड झोनची हद्द आणि बाधित मिळकतींची संख्या निश्चित करावी, अशी आग्रही मागणी केली. सध्या २००० हजार यार्डमध्ये सरसकट कोणालाच बांधकाम अथवा पायाभूत सोयी-सुविधांना परवानगी मिळत नाही. 'रेड झोन मुक्त पिंपरी-चिंचवड' करायचे असेल, सर्वप्रथम त्याची मोजणी करुन बाधित मिळकतींचे सर्वेक्षण करण्याची आवश्यकता आहे, असा दावाही उत्तम केंदळे यांनी केला आहे. रेड झोनची मोजणी झाल्यानंतर पिंपरी-चिंचवड शहरातील रेड झोनची हद्द ५०० यार्ड करावी, यासाठी पाठपुरावा करता येईल. मोजणीमुळे रेड झोन वाढेल, ही नागरिकांच्या डोळ्यात धुळफेक आहे. पूर्वी संरक्षण विभागाने २ हजार यार्ड रेड झोन जाहीर केला. २०१९ मध्ये मोजणी करुन टेन्टेटिव्ह लाईन आखण्यात आली. १ यार्ड म्हणजे 0.9144 मीटर अंतर असते. प्रशासनाने २ हजार यार्ड म्हणजे मोघमपणे २ हजार मीटर गृहित धरले आहे.



" यमुनानगर, कृष्णानगर भागातील रेड झोनबाबत मोजणी करण्यासाठी तत्कालीन नवनगर विकास प्राधिकरणाच्या सभेमध्ये २०२१ मध्ये ठराव करण्यात आला. राज्य सरकारच्या कार्यक्षेत्रातील या प्राधिकरणाने नागरिकांना प्लॉट दिले. त्या ठिकाणी घरे बांधली आहेत. त्यावर रेडझोन दाखवला असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी आहे. शासनाने दिलेल्या आणि प्लॅन मजूर करुन बांधलेली घरे रेड झोनबाधित होवू शकत नाहीत. यासाठी अनेक वर्षापासून आम्ही पाठपुरावा करीत आहोत. वर्क ऑफ डिफेन्स ॲक्ट-१९०३ नुसार रेड झोनची मोजणी होणे आवश्यक आहे. मोजणीसाठी आवश्यक फी महापालिका प्रशासनाने प्राधिकरणाला कळवावी, अशी सूचना विभागीय आयुक्तांनी दिली होती. प्राधिकरण पेठ क्रमांक २० ते २४ मधील वारस नोंद, सदनिका, गाळे, भूखंडाचे हस्तांतरण यामध्ये तांत्रिक अडचणी येत आहेत. त्यासाठी रेडझोनचे सीमांकन करण्याची आवश्यकता आहे. रेड झोन मोजणी आणि मिळकतींचे सर्वेक्षण केल्यानंतर ५०० यार्डपर्यंत रेड झोन कमी करण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडे पाठपुरावा करणार आहे. **– महेश लांडगे,**
आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

### रेड झोन हद्द 500 यार्ड करण्यासाठी बळ मिळणार..!

वस्तुत: ते अंतर १८२८.८ मीटर इतके आहे. त्याद्वारे सर्वे नंबर टेन्टेटिव्ह रेड झोन प्रभावित केले आहेत. वास्तविक, १८२८.८ मीटरच रेड झोन आहे. त्यामुळे मोजणी निश्चित केल्यास तात्काळ १५७ मीटर क्षेत्र रेड झोन मधून बाहेर जाईल. विशेष म्हणजे, संरक्षण विभागाने २००२ मध्ये २००० यार्डचा रेडझोन लादला आहे. पूर्वी तो ५०० यार्डच होता. त्यामुळे व्यापक जनहिताच्या दृष्टीने रेड झोनची मोजणी झाल्यास केंद्र सरकार, संरक्षण विभागाकडे रेड झोन कमी करण्याबाबत पाठपुरावा करण्यास बळ मिळणार आहे, असा दावाही उत्तम केंदळे यांनी केला आहे.

# पीसीईटीच्या १,०५५ विद्यार्थ्यांना मिळाली मोठ्या पगाराची नोकरी

## जागतिक पातळीवर औद्योगिक क्षेत्रामध्ये मंदीची लाट असतानाही मिळाली संधी

। पिंपरी ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**जागतिक पातळीवर औद्योगिक क्षेत्रामध्ये मंदीची लाट असतानाही पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना मोठ्या पगाराच्या नोकरीच्या संधी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या वतीने मिळवून देण्यात आल्या आहेत.**



पीसीईटी अभियांत्रिकीच्या अंतिम वर्षातील १,५०० विद्यार्थ्यांपैकी आतापर्यंत सुमारे १,०५५ नोकऱ्या मिळाल्या आहेत. उर्वरित विद्यार्थ्यांसाठी पुढील सहा महिन्यात अनेक नोकरी मेळावे आयोजित करण्याचे नियोजन केले आहे अशी माहिती पीसीईटी सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे यांनी प्रसिद्धीस दिली आहे.

या वर्षी आतापर्यंत १०५५ विद्यार्थ्यांची निवड नामांकित अशा आयटी व कोअर मॅन्युफॅक्चरींग कंपनीमध्ये झाली आहे. यामध्ये ॲक्सेंचर (१६८), कॅपजेमिनी (१०५), केपीआयटी (१०२) या कंपन्यांचा समावेश आहे. तर रोजगाराच्या संधी दिलेल्या आयटी प्रॉडक्ट कंपन्या वेरीटास, बीएमसी, सहज सॉफ्टवेअर, एसएपी या कंपन्या आहेत. कोअर मॅन्युफॅक्चरींग कंपन्यांमध्ये मर्सिडीज बेंझ, डसॉल्ट सिस्टिम्स, गोदरेज, मिंडा, किर्लोस्कर या नामांकित कंपनी आहेत. पीसीईटीचे सेंट्रल प्लेसमेंट सेल दर वर्षी विद्यार्थ्यांना सुमारे २५० पेक्षा जास्त नामांकित कंपन्यांत नोकरीची संधी मिळवून देण्यासाठी रोजगार मेळावे आयोजित करीत असते. या वर्षी पीसीईटी ग्रुपच्या २४० विद्यार्थ्यांना ७ लाखापेक्षा अधिक; ५६७ विद्यार्थ्यांना ५ लाख ते ७ लाख; १८१ विद्यार्थ्यांना ३.५ लाख ते ५ लाख आणि ६७ विद्यार्थ्यांना ३.५ लाखापेक्षा कमी वार्षिक पगाराच्या नोकऱ्या विविध कंपन्यांमध्ये मिळाल्या आहेत.

### निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन

निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष श्रीमती पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त व पीसीयु चे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, डॉ. हरीश तिवारी, डॉ. विलास देवतारे, डॉ. अपर्णा पांडे, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, सर्व शिक्षक यांनी केले व शुभेच्छा दिल्या. रोजगार मिळावे आयोजित करण्यात पीसीईटी सेंट्रल प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे, प्रा. संदीप पिल्लेवार, प्रा. दीपक पवार, प्रा. ऋषिकेश पांडे, प्रा. विजय टोपे, प्रा. हीना शर्मा, प्रा. ऐश्वर्या पाटील, मंगेश काळभोर सर्व विभागातील ट्रेनिंग प्लेसमेंट चे शिक्षक प्रतिनिधी व १०० हुन अधिक विद्यार्थी प्रतिनिधी यांनी योगदान दिले.

# बथ्थडयुगाचे कोरडेपण




**आज २५ जिल्ह्यांत पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. ३६ पैकी २५ जिल्हे म्हणजे तीन चतुर्थांश राज्य होरपळते आहे. मात्र, याचे कितपत गांभीर्य प्रचारखोर पक्ष, त्यांचे कार्यकर्ते, नोकरशाही आणि एकूणच समाजाला आहे? राज्यात गावे, वाड्या, वस्त्या मिळून ४२ हजार 'वसतिस्थाने' असतील. यातल्या साडेदहा हजारांहून अधिक गावे-वाड्या-वस्त्यांसाठी आज टँकर धावत आहेत.**

केंद्रातील मोदी सरकारला दहा वर्षे झाली. या काळात महाराष्ट्रात चार सरकारे आली. काही तासांच्या सरकारसहित चारही सरकारांमध्ये आलटून पालटून तेच पक्ष, तीच माणसे आहेत. केंद्रातले राज्यकर्ते आणि राज्यातले त्यांचे भाऊबंद अहोरात्र लंबाचवड्या गप्पा मारत असतात. मात्र, महाराष्ट्राच्या पाचवीला पूजलेला दुष्काळ काही हटायला तयार नाही. निवडणुकीचा एक टप्पा बाकी असला तरी महाराष्ट्रातील मतदान संपले आहे. या प्रचारात सर्व पक्षांच्या केंद्रीय किंवा राज्य पातळीवरील किती नेत्यांनी भाषणांमध्ये, मुलाखतींमध्ये, चर्चांच्या कार्यक्रमांमध्ये पाण्याचा आणि व्यापक अंगाने शेती व शेतकऱ्यांच्या हिताचा मुद्दा लावून धरला? आज २५ जिल्ह्यांत पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे. ३६ पैकी २५ जिल्हे म्हणजे तीन चतुर्थांश राज्य होरपळते आहे. मात्र, याचे कितपत गांभीर्य प्रचारखोर पक्ष, त्यांचे कार्यकर्ते, नोकरशाही



आणि एकूणच समाजाला आहे? राज्यात गावे, वाड्या, वस्त्या मिळून ४२ हजार 'वसतिस्थाने' असतील. यातल्या साडेदहा हजारांहून अधिक गावे-वाड्या-वस्त्यांसाठी आज टँकर धावत आहेत. म्हणजे, राज्यातल्या एकूण वस्त्यांपैकी २५ टक्के असे प्रमाण पडते. इथेही रोज टँकर येत नाहीच. राज्यात जे तीन-साडेतीन हजार टँकर धावत असतील; ते आपल्या गावात कधी येतात, याची लक्षावधी गावकरी चातकासारखे वाट पाहात बसतात. एकदा तो आला की, भांडणे, कटकटी, पाण्याची नासाडी, आपलीच भांडी भरण्याची स्पर्धा आणि कधी कधी तर कोरड्या विहिरीत रिकामे होणारे टँकर. निवडणुकीचा प्रचार चालू असताना कार्यकर्ते आणि नागरिकांनी पाणी पिऊन फेकून दिलेल्या हजारो बाटल्यांचे फोटो येत होते. या दोन्ही चित्रांमधली विसंगती, त्यातून होणारी आपली फसगत आणि मूळ समस्यांशी तुटलेले आपले नाते लक्षात येते.

मोदी यांचा दुसरा कार्यकाळ जून २०१९ मध्ये सुरू झाला. त्या सरकारने जो पूर्ण अर्थसंकल्प मांडला, त्यात 'हर घर जल' अशी योजना जाहीर करण्यात आली होती. कोणतीही योजना जाहीर करताना ती पुरी करण्याची कालमर्यादा ठरविण्याचा मोदी यांचा आग्रह असतो! त्यानुसार हे काम पाच वर्षांत पुरे करायचे होते. आता पुढच्या निवडणुका होऊन नवे सरकार येण्याची वेळ झाली. पाच वर्षांत 'हर घर जल' पोहोचले असते तर आज महाराष्ट्रात लाखो बायामुलांना वणवण करायला लागली असती का? महाराष्ट्रात देशातल्या दुसऱ्या क्रमांकाच्या नळजोडण्या देण्यात आल्या. पण त्या नळांमधून जर पाणीच येणार नसेल तर काय करायचे? राज्यात सन २०१४ मध्ये दुसरे भाजप-शिवसेना युतीचे सरकार आले. त्या देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने 'जलयुक्त शिवार' हा कार्यक्रम हाती घेतला. राज्यातली सगळी शिवारे जर त्यानंतर एव्हाना जलयुक्त झाली असती तर त्यातले चार-दोन टक्के पाणीही पिण्यासाठी लागले नसते. मग टँकर लागले असते का? आज कुठे आहेत ती जलयुक्त शिवारे आणि जलतृप्त कोट्यवधी कुटुंबे?

राज्यात सगळ्या धरणांमध्ये मिळून सरासरी वीस टक्केही पाणीसाठा नसेल. सगळ्या शहरांमध्येही जी पाणीकपात सुरू झाली आहे, ती यामुळेच. काही मोठ्या धरणांत पाणी असले तरी धरणांसहित हजारो जलाशय कोरडेठाक पडले आहेत. राज्यात मोठी, मध्यम, लहान मिळून दोन हजार धरणे आहेत. ती आज राज्यातला दुष्काळ निवारू शकत नाहीत.

यंदाचा उन्हाळा महाकडक आहे, असे एक कारण दिले जाते. त्यामुळे, बाष्पीभवनाचा वेग वाढतो. हे खरे असले तरी निसर्ग गेले दशकभर असाच भ्रमिष्टासारखा वागत आहे. माणसानेच त्याला तसे बनविले आहे. त्याचे हे वर्तन लक्षात ठेवूनच आखणी करायला हवी. महाराष्ट्राचे जलधोरण मूळ विषयालाच हात घालायला तयार नाही. तो म्हणजे, कृषी, कारखानदारी आणि घरगुती वापरासाठी १२ महिने पाणी कसे उपलब्ध करायचे, उपलब्ध पाण्याचा फेरवापर कसा करायचा आणि पाण्याचा प्रत्येक थेंब काटकसरीने कसा वापरायचा?

## संपादकीय »

# निकाल गुणवत्ता ठरवणार आहे का?

***जगभरात सध्या युद्धज्वर वाढला आहे. राष्ट्रांच्या वाढत्या महत्त्वाकांक्षा आणि त्यांना फुंकर घालून स्वतःचे ईप्सित साध्य करून घेणाऱ्या महाशक्तींमुळे संघर्षाचे प्रसंग सातत्याने उद्भवत आहेत.***

दहावीचा- माध्यमिक शालान्त परीक्षेचा निकाल आज (२७ मे) लागतो आहे... निकाल, रिझल्ट म्हटलं की गुण कमी जास्त होणार. समाजात एक दृष्टिक्षेप टाकून पाहिल्यास मुलांच्या गुणांची चिंता नोकरी/व्यवसायात स्थिर झालेल्या व स्वतःला सुशिक्षित म्हणून घेणाऱ्या पालकांना आहे. पण मुलांनी तरी असा विचार करणं आवश्यक आहे की, एका कागदावरील मार्कांची कुंडली खरंच आपलं भविष्य घडवेल का? स्पर्धा, गुण, गुणवत्ता यावर मुलांचं भविष्य, करिअर असतं असं कोण म्हणतं? मार्क म्हणजेच आयुष्य नाही, आयुष्यातलं यश मार्कांवर अवलंबून नाही हे दहावीचा निकाल लागताना लक्षात ठेवावं. परीक्षांमध्ये गुण मिळविणं हे अखेर एक तंत्र आहे. परीक्षेत विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरं लिहून गुण मिळवले जातात.

१९ मे, शनिवारची रात्र. ते दोघे मध्य प्रदेशातील छोट्या गावातून शिक्षण घेऊन पुण्यात नोकरीसाठी आलेले. पगारातून भावाचे शिक्षण आणि घरी पैसे पाठवण्याचे कर्तव्यही पार पाडणारे. पुण्यात शनिवारची रात्र ही सध्या ज्या पद्धतीने संपते तशाच प्रकारे संपवून; पण जबाबदारीने, जपूनच घरी चाललेले दोन तरुण जीव.

# खरी जबाबदारी कोणाची?

अचानक एक आलिशान कार प्रचंड वेगाने येते, त्या दोघांच्या बाइकवर धडकते आणि काही कळायच्या आत स्वतःच्या घरी चाललेले ते दोघे खरोखरीच 'निजधामास' जातात.

या भीषण अपघातात ती कार चालवणारा एक अल्पवयीन मुलगा. तो गाडी चालवतच नव्हता, मद्य प्यायलेलाच नव्हता, असे दाखवण्याचा प्रयत्न केला गेला. त्यासाठी सामान्य अपघाताची कलमे लावली गेली. त्यामुळे बाल न्याय मंडळाने त्याला अतिशय साध्या अटींवर जामीन दिला. यात पोलिस, बाल न्याय मंडळ, शासन, पबमालक आदी अनेकांना जबाबदार धरले जात असताना एका अतिशय महत्त्वाच्या घटकाकडे मात्र सर्वांचे दुर्लक्ष होते आहे. मुळात परीक्षेचा निकाल दारू पिऊन साजरा करायचा असतो? आपले 'बाळ' कुठे आणि काय करायला चाललेय याची त्याच्या पालकांना नक्कीच कल्पना होती. असे पालक हे या अपघाताला, आणि



जे जीव गेले त्या दोघांच्या मृत्यूलाच नव्हे, तर ह्या 'बाळा'च्याही आयुष्याच्या बरबादीला कारणीभूत आहेत.

बदललेली जीवनशैली, 'हाय सोसायटी'च्या भलत्या कल्पना, पब संस्कृती, गर्ल फ्रेंड, बॉय फ्रेंड आदी गोष्टींनाच 'मॉडर्न' समजणे यामुळे आपल्या कुटुंबसंस्थेची अवस्था भयानक झाली आहे. स्क्रीनच्या अतिवापरामुळे घरातल्यांचा एकमेकांशी संवाद संपत चालला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घरांमध्ये आई आणि वडील दोघेही हातातोंडाची गाठ घालण्याच्या प्रयत्नात असल्याने त्यांना मुलांकडे लक्ष द्यायला वेळ नाही. आर्थिकदृष्ट्या मध्यम घरातली माणसे स्वतःला उच्च उत्पन्न गटात नेण्यासाठी ऑफिसच्या आणि घरातल्या कामात सतत गुंग. अतिसंपन्न घरातली मुले पालकांबरोबर वाढण्यापेक्षा आपल्या घरातल्या नोकरांबरोबरच जास्त वाढतात. आपल्या घरात, आपल्या बाळाला कुठेतरी सोपवणारी आई या बाळाला नेमकी किती माया लावू शकणार? पण लक्षात कोण घेणार?

कित्येक घरांमध्ये आई-वडील असे दोघांचेही स्वतंत्र व्यवसाय असतात. त्यासोबत त्यांच्या व्यावसायिक जबाबदाऱ्या आणि व्यग्रता आलीच.

व्यवसायातली आव्हाने पेलताना घरातल्या मुलांकडे दुर्लक्ष होणे साहजिकच. कित्येक घरांमध्ये पती-पत्नी यांच्यात बेनबाव असतो. कित्येक मोठ्या 'बिझनेस हाऊस'मध्ये ह्या अंतर्गत वादांचे परिणाम व्यवसायावर होतील, म्हणून असे वाद दडवले जातात. या सगळ्या पडझडीचे, दुर्लक्षाचे परिणाम या मुलांवर होतच असतात.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# बारामती, कल्याण, ठाणे कोण जिंकणार?

## महाराष्ट्रात महायुतीच्या सर्वाधिक जागा जिंकून येतील: अनिल थत्ते

। मुंबई ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**“श्रीकांत शिंदे दोन अडीच लाखांनी निवडून येतील तर नरेश म्हस्के एक-दीड लाखांनी निवडून येतील. राजन विचारे यांनी ठाण्यामध्ये काही खासदार झाल्यानंतर कामगिरी दाखवली नाही. त्यामुळे त्यांचे फारसे अस्तित्व नव्हते”, असं भाकीत अनिल थत्ते यांनी वर्तवलं आहे.**



### ‘श्रीकांत शिंदे दोन अडीच लाखांनी निवडून येतील’

“शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांचे एकनाथ शिंदे हे शिष्य आहेत. आनंदी दिघे यांच्यावर ठाकरेंनी अन्याय केला हे धर्मवीर पिक्चरच्या निमित्ताने सेट झाले. एकनाथ शिंदे एकनाथ शिंदे आहेत. ते साम, दाम, दंड भेद वापरून निवडणुकीत उतरले. श्रीकांत शिंदे दोन अडीच लाखांनी निवडून येतील तर नरेश म्हस्के एक-दीड लाखांनी निवडून येतील. राजन विचारे यांनी ठाण्यामध्ये काही खासदार झाल्यानंतर कामगिरी दाखवली नाही. त्यामुळे त्यांचे फारसे अस्तित्व नव्हते”, असं भाकीत अनिल थत्ते यांनी वर्तवलं.

प्रसिद्ध ज्योतिष अनिल थत्ते यांनी लोकसभा निवडणुकीआधी अनेक भाकीतं वर्तवली आहे. महाराष्ट्रात महायुतीच्या सर्वाधिक जागा जिंकून येतील, असं भाकीत अनिल थत्ते यांनी वर्तवलं आहे. विशेष म्हणजे अनिल थत्ते यांनी बारामती, कल्याण, ठाणे लोकसभा मतदारसंघात कोण जिंकून येणार? याबाबत भविष्यवाणी केली आहे.

“सुप्रिया सुळे यांना बॅकग्राऊंड आहे. अजित पवारांनी कोणालातरी कार्यकर्त्याला उभे केले असते तर बात वेगळी होती. मात्र स्वतःच्या पत्नीला त्यांनी उभे केले. त्यामुळे मला तरी वाटतं की सुप्रिया सुळे तिकडे निवडून येतील. मुंबई वायव्य मतदारसंघात ठाकरे गटाचे अमोल कीर्तिकर हे शिंदे गटाचे रवींद्र वायकर यांच्यावर मात करतील”, असा दावा अनिल थत्ते यांनी केला.

“केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी स्वतःची पुण्याई पणाला लावली आहे. मात्र त्यांच्या दोन मुलांमुळे कोकणात प्रचंड अस्वस्थता आहे. ते निवडून आले तर त्यांची पुण्याई ही कामी आली असे म्हणता येईल. तर ते पडले तर त्याला कारणीभूत त्यांची दोन्ही मुले असतील”, असं भाकीत अनिल थत्ते यांनी वर्तवलं आहे. “प्रकाश परांजपे हे पहिले नगरसेवक होते. नंतर खासदार झाले. त्यामुळे ठाण्याला नगरसेवक ते खासदार अशी परंपरा आहे. त्यामुळे यात नरेश मस्के खासदार झाले तर काही विशेष नाही. लोकांमध्ये मिसळण्याबाबत नरेश जास्त सक्रीय आहेत. एकनाथ शिंदे यांचा हुकूमाचा एक्का नरेश म्हस्के आहेत. तो त्यांनी बाहेर काढला आहे”, असा दावा अनिल थत्ते यांनी केला.

“एकनाथ शिंदे यांचे मुस्लिमांबरोबर अत्यंत चांगले संबंध आहेत. जर मशिदीतून फतवा मिळाला तर एकनाथ शिंदे यांना मत द्या असाच फतवा निघेल त्यांचा प्रॉब्लेम झाला. राज ठाकरेंनी कळव्यामध्ये येऊन जे भाषण केले त्यामुळे त्यांना प्रॉब्लेम झाला. एकनाथ शिंदेंना देखील हे भाषण अपेक्षित नव्हते. त्यांची समजूत घालता घालता एकनाथ शिंदे यांची पंचायत झाली”, असा दावा अनिल थत्ते यांनी केला. “संविधानाचा विषय हा मुसलमानांपेक्षा दलितांना जास्त भावनिक वाटतो. संविधानात मोदी बदल करणार त्यामध्ये काही गोष्टी मुसलमानांच्या विरोधात आहेत. हे अजून मुसलमानांच्या लक्षात आलेले नाही. पण श्रीकांतला याचा कोणताही फटका बसला नाही. बसणार नाही. त्याचं गुडवील चांगलं आहे”, असं अनिल थत्ते म्हणाले.

---

# बोगस ॲकॅडमींच्या चौकशीचे केसरकरांचे आदेश

## पालकांना आमिषे दाखवून प्रवेशासाठी भुरळ पाडून अमाप माया गोळा केल्याचा आरोप

। कराड ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**शहर परिसरासह लगतच्या विद्यानगर- सैदापूरमध्ये बोगस ॲकॅडमींकडून विद्यार्थी व पालकांना वेगवेगळी आमिषे दाखवून प्रवेशासाठी भुरळ पाडून अमाप माया गोळा केली जात आहे. वैध परवाना नसतानाही अनेक वर्षे सुरु असलेल्या या लुटीची चौकशी करून संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांच्याकडे प्रहार जनशक्ती पक्षातर्फे निवेदनाने करण्यात आली. या वेळी निवेदनकर्त्यांच्या मागणीनुसार चौकशीचे आदेश शिक्षणमंत्री केसरकरांनी दिले असल्याची माहिती ‘प्रहार जनशक्ती’चे नेते मनोज माळी यांनी दिली.**



### बेसुमार शुल्क घेऊन फसवणूक

संघटनांच्या निवेदनात म्हटले आहे की, कराड शहराला शैक्षणिक क्षेत्राची मोठी परंपरा आहे. आज विद्यानगरमध्ये हजारो विद्यार्थी विविध महाविद्यालयातून शिक्षण घेत आहेत. राज्याच्या कोनाकोपरातूनही विद्यार्थी येत असतात. मात्र, शैक्षणिक परंपरेला काळीमा फासण्याचा उद्योग बेकायदा सुरू असलेल्या ॲकॅडमी चालकांकडून होत आहे.

### प्रशासनाला स्वतंत्र निवेदने

कराड-विद्यानगर परिसरात सुमारे ८० ॲकॅडमी असून, यातील अनेक ॲकॅडमी चालकांकडे कोणताही अधिकृत परवाना नाही अथवा शिक्षण विभागाचे त्यांच्यावर कोणतेही नियंत्रण नाही. यामुळे मोठी फसवणूक होत आहे. या विरोधात प्रहार जनशक्तीसह रयत क्रांती, शेतकरी संघटना, बळीराजा, स्वाभिमानी शेतकरी संघटना, जिल्हा सैनिक फेडरेशन, पालवी महिला मंच, शैक्षणिक क्रांती संघटना, क्रीडा प्रशिक्षक संघ अशा २२ संघटनांनी एकत्र येऊन बोगस ॲकॅडमींवर कारवाई करण्याबाबत प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, गटशिक्षणाधिकारी बिपिन मोरे यांना निवेदन दिले आहे. यावर, गटशिक्षणाधिकारी मोरे यांनी लगेचच या प्रकरणाच्या चौकशीच्या लेखी सूचना दिल्या आहेत.

### चौकशीच्या लेखी सूचना

दरम्यान, या प्रकरणाच्या चौकशीच्या लेखी सूचना गटशिक्षणाधिकारी बिपिन मोरे यांनी दिल्या आहेत.

### विद्यार्थी व पालकांमध्येही खळबळ

मनोज माळी यांच्या नेतृत्वाखालील ‘प्रहार जनशक्ती’च्या शिष्टमंडळाने शिक्षणमंत्री केसरकर यांची समक्ष भेट घेवून या गैरप्रकारावर चर्चा केली. त्या वेळी केसरकर यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेवून तत्काळ चौकशीचे आदेश दिल्याने शिक्षण क्षेत्रासह विद्यार्थी व पालकांमध्येही खळबळ उडाली.

### 22 संघटना आक्रमक

कराडचे उपनगर असलेल्या विद्यानगर- सैदापूर परिसरात बेकायदा म्हणून आरोप असलेल्या ॲकॅडमींविरोधात विविध २२ संघटना आक्रमक झाल्या आहेत. या संघटनांनी स्वतंत्रपणे आपली निवेदने शिक्षणमंत्री तसेच प्रशासनाला दिली आहेत. या प्रकरणाच्या चौकशीच्या लेखी सूचना दिल्या आहेत.

# महाराष्ट्र, यूपी, बिहारमध्ये BJP ला नुकसान!

## प्रशांत किशोर यांनी केला मोठा दावा

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज


**काही लोकांचे म्हणणे आहे की यंदा राजस्थान आणि हरियाणामध्ये भाजपाच्या जागा कमी होत आहेत. परंतू मला तरी अजून तरी कोणी असा भेटला नाही जो असा दावा करेल की विरोधी पक्ष एखाद्या राज्यात संपूर्ण विजय मिळवेल असेही प्रशांत किशोर यांनी म्हटले आहे.**

प्रशांत किशोर यांना राजकीय रणनीतीकार म्हटले जाते. प्रशांत किशोर यांनी लोकसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर भविष्यवाणी केली जात आहे. प्रशांत किशोर यांनी भाजपाबाबत मोठा अंदाज वर्तविला आहे. भाजपा 370 वर पोहचणार नाही असे म्हटले जात आहे. परंतू भाजपाला किमान किती जागा मिळतील हे देखील त्यांनी सांगितले आहे. पाहूयात काय अंदाज त्यांनी वर्तविला आहे ...एका चॅनलशी बोलताना प्रशांत किशोर यांनी सांगितले की भाजपाची तुलना यावेळी भाजपाच्या 2019 च्या लोकसभा निवडणूकांशी केली जात आहे. भाजपाने गेल्या लोकसभा निवडणूकांत 303 जागा जिंकल्या होत्या. प्रशांत किशोर यांनी सांगितले की गेल्या निवडणूकांत भाजपाने ज्या 303 जागा जिंकल्या होत्या. त्या भाजपाने कोठून जिंकल्या होत्या याची माहीती घेऊयात...या 303 जागापैकी भाजपाने 250 जागा नॉर्थ वेस्टमधून जिंकल्या होत्या. यावेळी मात्र भाजपाला या नॉर्थ वेस्टमधून 50 हून जास्त जागांचे नुकसान होणार आहे. भाजपाला पूर्व-दक्षिणमध्ये फायदा होईल असा दावा प्रशांत किशोर यांनी केला आहे. बिहार, ओडिशा, बंगाल, तामिळनाडू, तेलंगणा, केरळ आणि आंध्रप्रदेश या क्षेत्रात भाजपाकडे आता 50 जागा आहेत.

परंतू या निवडणूकांत या राज्यामध्ये भाजपाचे मतदान टक्केवारी आणि दोन्ही वाढली आहे. बंगाल, ओडीशा, आसाम, तेलंगणा, आंध्रप्रदेश आणि केरळमध्ये भाजपाच्या जागा 15-20 वाढत आहेत. कोणत्या राज्यात किती वाढतील हे महत्वाचे नाही. प्रशांत किशोर म्हणाले की सेफोलॉजिस्ट योगेंद्र यादव यांनी सांगितले की भाजपाच्या 272 जागा येणार नाहीत. त्यांच्या मते ते 268 जागांवरच भाजपाची घौडदौड थांबेल असे म्हणत आहेत. तरीही सत्तेत भाजपाच येईल असे यादव यांचे म्हणणे आहे. लोकांना वाटतेय की उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात भाजपाला मोठे नुकसान होणार आहे.

### युपी, महाराष्ट्र आणि बिहारमध्ये काय होणार ?

महाराष्ट्रात विरोधी पक्षाला कमाल 20-25 जागा जरी जिंकल्या तरी सध्या भाजपाला महाराष्ट्रात 23 जागा आहेत. त्यामुळे भाजपाचे नुकसान यंदाही होणार नाही. काही लाकांचे म्हणणे आहे की भाजपाला उत्तर प्रदेशात नुकसान होत आहे. परंतू लोक हे विसरत आहेत की गेल्यावेळी भाजपाला 2014 च्या तुलनेत बिहार आणि युपीत जवळपास 25 जागांचे नुकसान झाले होते. कारण समाजवादी पार्टी आणि बसपा एकत्र लढले होते. जर कोणी म्हणत असेल की उत्तर प्रदेशात भाजपाच्या 20 जागा कमी होतील तर माझे असे म्हणणे आहे की भाजपाचे नुकसान कुठे झाले आहे. ते आधीच 18 जागा हरले आहेत. भाजपाला नुकसान तेव्हाच होईल जेव्हा भाजपाला 40 ते 50 जागांचे नुकसान होईल. परंतू असे विरोधी पक्ष देखील म्हणत नाहीत, ना सत्ताधारी. प्रशांत किशोर यांनी सांगितले की यंदा बिहारमध्ये असे तरी काही दिसत नाही.



# मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार?

## निकालाआधीच मुख्यमंत्र्यांनी केली तारीख जाहीर, सर्वत्र चर्चा

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशाच्या लोकसभा निवडणुकीसाठी मतदानाचा सहावा टप्पा 25 मे रोजी पूर्ण झाला. तर, 1 जून रोजी मतदानाचा सातवा आणि अखेरचा टप्पा पूर्ण होईल. अखेरच्या टप्प्यातील होणाऱ्या मतदानासाठी प्रचारात रंगत आली आहे. या निवडणुकीत भाजपने 'अब की बार, 400 पार' चा नारा देत विरोधकांच्या प्रचारातील हवा काढून टाकली. निवडणुकीच्या मतदानाचा निकाल 4 जून रोजी जाहीर होणार आहे. निकालानंतर देशात बहुमत कुणाचे हे सिद्ध होईल. पण, भाजपने नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेण्याची तयारी पूर्ण केलीय. अशातच आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी नरेंद्र मोदी पंतप्रधान म्हणून तिसऱ्यांदा कधी शपथ घेणार याची तारीखच जाहीर केली आहे.**



ओडिशातील पाटकुरा येथे मतदानाच्या शेवटच्या फेरीचा प्रचार करताना मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपचा विजय निश्चित असल्याचा दावा केला. ते म्हणाले, नरेंद्र मोदी पुन्हा पंतप्रधान होणार आहेत. ओडिशातही भाजपचा विजय होत आहे. आता फक्त निवडणुकीच्या निकालाची प्रतीक्षा आहे. नवे भाजप सरकार 10 जून रोजी शपथ घेणार आहे. यानंतर 11 जून रोजी पांडियन यांना तामिळनाडू विमानतळावर पाठवायचे आहे, अशी टीकाही त्यांनी केली.

मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा यांनी यावेळी पंजाबचे मुख्यमंत्री आणि आप नेते भगवंत मान यांच्यावरही टीका केली. पंजाब कर्जात बुडाला आहे पण आसामच्या वर्तमानपत्रात पंजाब सरकारच्या जाहिराती दिसतात. इथल्या मुख्यमंत्र्यांना सहा-सात चित्रपट करायला एवढा वेळ कसा मिळतो? राज्य कोण चालवत आहे? भगवंत मानजी यांनी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या स्वागतासाठी तिहार तुरुंगात गेले होते. भगवंत मानजी ज्या प्रकारे नतमस्तक होतात आणि दारू घोटाळ्यातील गुन्हेगाराचे स्वागत करतात ते पंजाबचे शौर्य कमकुवत करते असा टोला त्यांनी लगावला. त्यांचे वर्तन घटनात्मक भूमिका बजावणाऱ्या नेत्यासाठी अयोग्य असल्याचेही ते म्हणाले.

आसामचा मुख्यमंत्री या नात्याने मी तुरुंगात असलेल्या व्यक्तीचे स्वागत करण्यासाठी उत्तर प्रदेशात जाण्याची कल्पना करू शकत नाही. मी एखाद्या संत किंवा महान व्यक्तीच्या स्वागतासाठी जाऊ शकतो. परंतु, तिहार तुरुंगातून बाहेर आलेल्या व्यक्तीचे स्वागत करायचे असते तर मी दुसऱ्याच दिवशी राजीनामा दिला असता. हा आसामच्या स्वाभिमानाचा आणि सन्मानाचा विश्वासघात असेल असे ते म्हणाले. जाहीर सभेनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना हिमंता बिस्वा सरमा यांनी आता प्रतीक्षा फक्त 4 जूनची आहे. आम्ही (भाजप) 400 ने सुरुवात केली होती आणि 400 नेच संपवू असे ते म्हणाले.

### 10 जूनला शपथविधीचे आयोजन

येत्या १० जूनला नरेंद्र मोदी यांच्या शपथविधीचे आयोजन करण्यात आल्याची चर्चा आहे. लोकसभा निवडणूक २०२४ चा निकाल ०४ जून रोजी लागणार असून एनडीए विरुध्द इंडी आघाडी यांच्यात रस्सीखेच पाहायला मिळत आहे. तसेच, नरेंद्र मोदी यांनी आपल्या जाहीर भाषणात भाजपला देशभरात ४०० हून अधिक जागा मिळणार असल्याचे जाहीरपणे सांगितले आहे. त्यामुळे येत्या ०४ जूनला केंद्रात भाजप बहुमताने सत्तेत येत नरेंद्र मोदी दि. १० जूनला तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतील, असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपची सत्ता आल्यानंतर नरेंद्र मोदी दि. १० जूनला दिल्लीत पंतप्रधानपदाची शपथ घेतील, असे संकेत दिले आहेत. याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अधिवेशन पुढे ढकलणार का, याबाबत चर्चा सुरू झाल्या आहेत. दरम्यान, भाजप पक्षांतर्गत नेत्यांना आपण ३०० जागांचा टप्पा पार केला असून पुन्हा एकदा सत्ता स्थापन करु असा विश्वास वाटतो आहे. त्यामुळे मतमोजणीनंतर येत्या १० जूनला नरेंद्र मोदी यांच्या

# शर्वरी वाघच्या आयटम साँगने घातला धुमाकूळ



आदित्य सरपोतदार दिग्दर्शित 'मुंज्या' सिनेमा हा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यामध्ये महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत नेते मनोहर जोशी यांची नात शर्वरी वाघ ही देखील झळकणार आहे. सध्या या सिनेमातील एका गाण्यामुळे शर्वरी चर्चेत आलीये. मुंज्या सिनेमात शर्वरी आयटम साँगमध्ये दिसणार आहे. तिच्या या बोल्ड लूकची जोरदार चर्चा सुरु आहे. येत्या 7 जून रोजी मुंज्या हा सिनेमा प्रदर्शित होणार आहे. काही दिवसांपूर्वीच या सिनेमाचा ट्रेलरही भेटीला आला होता. त्यानंतर या सिनेमातील आयटम साँग प्रेक्षकांच्या भेटीला आलं आहे. तरस हे या सिनेमातलं गाणं असून यामध्ये शर्वरी वाघ दिसत आहे. तिच्या घायाळ करणाऱ्या अदांनी सोशल मीडियावर चांगलाच धुमाकूळ घातलाय.

### सिनेमा कधी रिलीज होणार?

स्त्री आणि भेडियानंतर मॅडॉक फिल्म्सकडून पुन्हा एकदा नव्या सिनेमाची घोषणा करण्यात आली आहे. हा सिनेमा येत्या 7 जूनला सिनेमागृहात प्रदर्शित करण्यात येणार आहे. आदित्य सरपोतदार दिग्दर्शित हा सिनेमा विशेषकरुन कोकणाती मुंज्या या भूतावर असल्याचं सांगण्यात येत आहे. या चित्रपटात शर्वरी वाघ, मोना सिंग, अभय वर्मा आणि सत्यराज या कलाकारांचा समावेश आहे.

### शर्वरीचा सिनेप्रवास

शर्वरी वाघ ही महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री दिवंगत मनोहर जोशी यांची नात आहे. तिने 'द फरगॉटन आर्मी- आझादी के लिये' या वेबसिरिजमधून तिच्या अभियनच्या कारकिर्दीला सुरुवात केली. या सिरिजच्या आधी लव्ह रंजन आणि संजय लीला भन्साळी यांच्यासह सहाय्यक दिग्दर्शक म्हणूनही काम केलं होतं. आता ती एका आयटम साँगमध्ये झळकणार आहे.

# आठ वर्षांनी अभिनेत्याची स्टार प्रवाहवर पुन्हा एन्ट्री!



'स्टार प्रवाह' वाहिनीवर सध्या नव्या मालिकांचं सत्र सुरु झालं आहे. काही नव्या मालिका वाहिनीवर सुरु झाल्या आहेत, तर काही नव्या मालिका या लवकरच पुन्हा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. वाहिनीवर लवकरच येड प्रेमाचं लागलं आणि थोडं तुझं थोडं तुझं माझं या नव्या मालिका सुरु होणार आहेत. 'थोडं तुझं आणि थोडं माझं' या मालिकेतून अभिनेत्री शिवानी सुर्वे ही नऊ वर्षांनी मालिकाविश्वात परतली आहे. त्यातच आता या मालिकेचा नवा प्रोमो शेअर करण्यात आला आहे. यामध्ये अभिनेता समीर परांजपे देखील आठ वर्षांनी पुन्हा मालिकेत स्टार प्रवाहच्या मालिकेत झळकणार आहे.

समीर परांजपे हा आठ वर्षांनी गोठ या मालिकेत झळकला होता. त्याच्या या मालिकेला प्रेक्षकांनी भरुभरुन प्रेमही दिलं. त्यानंतर तो सुंदरा मनामध्ये भरली या मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला आला. त्यानंतर पुन्हा एकदा समीर मालिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येतोय. या मालिकेत तो तेजस प्रभूची भूमिका साकारणार आहे.

### कशी आहे समीरची भूमिका?

समीर या मालिकेत प्रभू कुटुंबातील एक सदस्य दाखवला आहे. तो तेजस प्रभू हे पात्र साकारणार आहे. या मालिकेत अभिनेत्री मानसी कुलकर्णी ही गायत्री प्रभूच्या भूमिकेत आहे. समीर म्हणजेच तेजस प्रभू हा गायत्रीचा दिर दाखवण्यात आला आहे. प्रभू कुटुंबाची परिस्थिती बेताची असल्यामुळे गायत्री प्रभूच्या उत्पन्नावर संपूर्ण घर चालत असतं. त्यामुळे गायत्रीचा नेहमीच घरच्यांना धाक असल्याचं पाहायला मिळतं. पण या सगळ्याला तेजस मात्र नेहमीच विरोध करत आहे. गायत्रीला प्रभूंचं घर विकायचं असतं. पण त्यालाही तेजस नकार देतो. त्यामुळे या मालिकेचं कथानक आता कसं असणार याची उत्सुकता प्रेक्षकांना लागून राहिली आहे.

## जान्हवी कपूरने होणाऱ्या सासूबाईंसाठी घेतला मोठा निर्णय!



गेल्या काही दिवसांपासून अभिनेत्री जान्हवी कपूर तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आहे. जान्हवी कपूर माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा नातू शिखर पहाडिया याला डेट करत आहे. शिखर आणि जान्हवी यांना अनेक ठिकाणी एकत्र स्पॉट देखील करण्यात आलं आहे. पण अद्याप दोघांनी देखली सर्वांसमोर त्यांच्या नात्या स्वीकार आणि अधिकृत घोषणा केलेली नाही. पण सोशल मीडियावर दोघे एकमेकांना सपोर्ट करताना दिसतात. एकेकडे शिखर, जान्हवी हिच्या 'मिस्टर एन्ड मिसेज माही' सिनेमाचा ट्रेलर शेअर करतो, तर दुसरीकडे जान्हवी होणाऱ्या सासूबाईंच्या आगामी मालिकेचं प्रमोशन करताना दिसत आहे. सध्या सर्वत्र फक्त आणि फक्त जान्हवी कपूर हिच्या सोशल मीडिया पोस्टची चर्चा रंगली आहे.

जान्हवी कपूर हिने सोशल मीडियावर एक मालिकाचा व्हिडीओ पोस्ट केला आहे.. ज्यामध्ये जान्हवी शिखर याची आईला प्रोत्साहित करताना दिसत आहे. जान्हवीने तिच्या इंस्टाग्राम स्टोरीमध्ये बॉयफ्रेंड शिखर पहाडियाची आई स्मृती संजय पहाडिया यांच्या आगामी मालिकेचा प्रोमो पोस्ट केला आहे. 'मला तुमता अभिमान वाटतो काकी' असं लिहिले आहे.

# शाहिद-मीराने पुन्हा खरेदी केलं 'लग्जरी अपार्टमेंट'



शाहिद कपूर आणि मीरा राजपूत हे बी-टाऊनमधील सर्वांच्याच आवडीचं जोडपं आहे. त्यांच्या नात्याविषयी ते अनेकदा सोशल मीडियावर व्यक्त होत असतात. तसेच ते दोघंही बऱ्याचदा त्यांच्या चाहत्यांना अनेक आनंदाच्या बातम्याही देत असतात. दोन महिन्यांपूर्वी शाहिद आणि मीराने जुहूमध्ये एका आलिशान घराची खरेदी केली होती. त्यानंतर पुन्हा एकदा त्यांनी एक आलिशान घर खरेदी केलं आहे. शाहिद आणि मीरा यांनी मुंबईतच नवं घर खरेदी केलं आहे. शाहिद कपूर आणि मीरा राजपूत यांनी मुंबईच्या वरळी भागातील ओबेरॉय 360 वेस्टमध्ये घरं घेतलं आहे. तसेच हे अपार्टमेंट 5,395 चौरस फूट आहे आणि तीन पार्किंगसाठीच्या जागा देखील आहेत. त्यांनी 24 मे 2024 रोजी हे घर खरेदी केल्याची माहिती देण्यात आलीये.

### घराची किंमत किती?

'हिंदुस्तान टाईम्स'च्या वृत्तानुसार, पूर कुटुंबाने चंदक रिअल्टर्स प्रायव्हेट लिमिटेडकडून खरेदी केले होते. तसेच या घराची किंमत 59 कोटी रुपयांच्या आसपास असल्याची माहिती देखील देण्यात आलीये.

# पहिल्याच फेरीत नदाल गारद!

## जर्मनीच्या अॅलेक्झांडर झ्वेरेवकडून सरळ सेटमध्ये पराभूत

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**क्ले कोर्टचा (लाल माती) सम्राट मानला जाणारा आणि तब्बल १४ वेळा विजेतेपद मिळविणाऱ्या राफेल नदालवर यंदाच्या फ्रेंच खुल्या टेनिस स्पर्धेत पहिल्याच फेरीत गारद होण्याची वेळ आली. जर्मनीच्या चौथ्या मानांकित अॅलेक्झांडर झ्वेरेवने सोमवारी पहिल्या फेरीच्या लढतीत नदालचा ६-३, ७-६(७-५), ६-३ असा पराभव केला. नदालला दुखापतीमुळे निर्माण झालेल्या अपयशाच्या चक्रव्यूहातून बाहेर पडता आले नाही. नदालवर कारकीर्दीत प्रथमच या स्पर्धेत पहिल्या फेरीत पराभूत होण्याची नामुष्की ओढवली.**



कारकीर्दीत २२ ग्रँडस्लॅम विजेतीपदे मिळविणाऱ्या नदालने सर्वात प्रथम २००५ मध्ये फ्रेंच टेनिस स्पर्धेचे विजेतेपद मिळवले. त्यानंतर २०२२ मध्ये तो येथे अखेरची स्पर्धा जिंकली. त्यानंतर मात्र दुखापतीने नदालच्या कारकीर्दीला उतरती कळा लागली. पहिला सेट गमावल्यानंतर नदालने दुसऱ्या सेटमध्ये ४-२ अशी आघाडी मिळवली होती. लढतीमधील दहाव्या गेमला दोन ब्रेक पॉइंट वाचवून झ्वेरेवने 'सर्व्हिस' राखली आणि त्यानंतर टायब्रेकरमध्ये बाजी मारली. तिसऱ्या सेटलाही नदाल सुरवातीलाच ब्रेकची संधी साधून २-० असा आघाडीवर होता. या वेळीही झ्वेरेवने लगेच बाजी मारून २-२ अशी बरोबरी साधली. सातव्या गेमला आणखी एकदा नदालची 'सर्व्हिस' भेदत झ्वेरेवने मिळवलेली आघाडी कायम राखत विजयावर शिक्कामोर्तब केले.

नदाल आणि झ्वेरेव दोघांसाठी ही लढत प्रतिष्ठेची होती. झ्वेरेवने विजयानंतर काय बोलू? अशीच सुरुवात केली. लहानपणापासून ज्याचा खेळ बघत कोर्टवर उतरलो त्याच्याबरोबर खेळायला मिळणे हीच मोठी गोष्ट आहे. आजचा दिवस त्याचा नव्हता. पण, हा क्षण त्याचा आहे असे म्हणत झ्वेरेव अखेरच्या प्रतिक्रियेसाठी कोर्टवरून बाजूला झाला आणि नदालला बोलण्याची संधी दिली.

खरंच, या क्षणी बोलणे माझ्यासाठी कठिण आहे अशी सुरुवात नदालने केली. पण, त्याचा स्वर भारावलेला होता. जगभरातून आलेल्या चाहत्यांशी बोलताना नदाल म्हणाला, "मला माहित नाही की तुमच्यासमोर मी अखेरचा सामना खेळलो आहे. जर हा खरेच हा अखेरचा सामना असेल, तर मी प्रत्येक क्षणाचा आनंद घेतला. आता माझ्या मनात काय भावना आहेत हे शब्दात सांगणे खूप कठीण आहे. तुमच्यासारखे चाहते जेव्हा मोठ्या संख्येने पाठिंबा देण्यासाठी उपस्थित असतात, तेव्हा खेळण्यासाठी वेगळा हुरुप येतो." नदालने शेवटी झ्वेरेवच्या खेळाचेही कौतुक केले. झ्वेरेव गुणी आणि चांगला खेळाडू आहे. त्याला स्पर्धेच्या वाटचालीसाठी शुभेच्छा.. असे म्हणून नदालने माईक परत केला, तेव्हा कोर्टवर उपस्थित प्रत्येक जण नदालला निरोप देण्यासाठी उभा राहिला होता.

### श्वीऑटेक, त्सित्सिपासची आगेकूच

पोलंडच्या अग्रमानांकित इगा श्वीऑटेकने महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळवला. तर, ग्रीसचा स्टेफानोस त्सित्सिपास व इटलीचा यानिक सिन्नेर यांनीही पुरुष एकेरीच्या सामन्यात विजय नोंदवत आगेकूच केली. महिला एकेरीच्या सामन्यात श्वीऑटेकने फ्रान्सच्या लिओलिया जीनजीनवर ६-१, ६-२ असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. तर, ओन्स जाबेऊरने साचिआ विकेरीला ६-३, ६-२ असे पराभूत करत पुढच्या फेरीत स्थान मिळवले. पुरुष एकेरीच्या सामन्यात सिन्नेरने अमेरिकेच्या ख्रिस्तोफर यूबँक्सला ६-३, ६-३, ६-४ असे सरळ सेटमध्ये नमवत दुसऱ्या फेरीत धडक मारली. तर, त्सित्सिपासने हंगेरीच्या मार्टोन फुक्सोविक्सला ७-६ (९-७), ६-४, ६-१ असे पराभूत केले. स्वित्झर्लंडच्या स्टॅन वावरिंकाने ब्रिटनच्या अँडी मरेचे आव्हान ६-४, ६-४, ६-२ असे सरळ सेटमध्ये संपुष्टात आणले. भारताच्या सुमित नागलला कारेन खाचनोवककडून २-६, ०-६, ६-७ (५-७) असे पराभूत व्हावे लागले.

> हे असे कोर्ट आहे की ज्यावर मी सर्वाधिक प्रेम करतो. वयाच्या ३८व्या वर्षी मी कोर्टवर खेळू शकेन की नाही असे वाटले नव्हते. पण, मी खेळलो आणि आनंदही घेतला. तुमच्यासमोर पुन्हा येण्याची खूप इच्छा आहे, पण त्याबाबत अजून खात्री नाही.
>
> **– राफेल नदाल.**

# कोलकाताच्या विजयावर रायुडूचा विराटला खोचक टोला

## विराटच्या ऑरेंज कॅपबाबत केले विधान त्याची चर्चा जोरदार रंगली

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२४चा अंतिम आणि निर्णायक सामना हा कोलकत्ता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद या संघात रंगला असून कोलकात्ताने विजयी होण्याचा मान पटकावला. तर या हंगामात अनेक खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले.आता कोलकात्ताने हैदराबादवर मात करत तिसऱ्यांदा चॅम्पियन बनल्यानंतर माजी खेळाडू अंबाती रायुडूने विराटच्या ऑरेंज कॅपबाबत एक विधान केले असून त्याची चर्चा जोरदार रंगली आहे.**




इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल ) २०२४ च्या या १७ व्या हंगामात ऑरेंज कॅप विराट कोहलीच्या नावावर राहिली. कोहली या हंगामात सुरुवातीपासून ऑरेंज कॅपच्या शर्यतीत आघाडीवर होता आणि शेवटपर्यंत एकही फलंदाज त्याला मागे टाकू शकला नाही. विराटला ऑरेंज कॅप जरी मिळाली असली तरी त्याच्या संघाला याही वर्षी ट्रॉफी जिंकता आली नाही. आता कोलकात्ताने हैदराबादवर मात करत तिसऱ्यांदा चॅम्पियन बनल्यानंतर माजी खेळाडू अंबाती रायुडूने विराटच्या ऑरेंज कॅपबाबत एक विधान केले असून त्याची चर्चा जोरदार रंगली आहे.

### विराटवर निशाणा

अंबाती रायुडूने कोलकत्ता संघाचे जिंकल्याबद्दल कौतुक केले पण विराटला मात्र टोमणा मारला. ते म्हणाला की, "ऑरेंज कॅपने आयपीएल ट्रॉफी जिंकली जात नाही. ट्रॉफी जिंकण्यासाठी संघाचे सहकार्य आवश्यक आहे. कोलकत्ता मध्ये मिचेल स्टार्क, आंद्रे रसेल आणि सुनील नरेन या सर्वांनी योगदान दिले आहे, आणि त्यामुळे कोलकत्ता विजयी झाला. ट्रॉफी जिंकण्यासाठी सर्व खेळाडूंना थोडेफार योगदान द्यावे लागते. एक ऑरेंज कॅप जिंकणारा खेळाडू कोणतीही ट्रॉफी जिंकत नाही." अंबाती रायडूच्या या विधानानंतर आरसीबीचे चाहते पुन्हा एकदा संतापले आहेत.

### रायुडूने चेन्नई आणि मुंबईसाठी पटकावले विजेतेपद

अंबाती रायुडू हा आयपीएलमध्ये मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या दोन्ही संघाकडून खेळला असून त्याने दोन्ही संघांसाठी विजेतेपद पटकावली आहेत. रायुडूने २०१३, २०१५, २०१७ मध्ये मुंबईसाठी आयपीएल ट्रॉफी जिंकली आहे. यानंतर त्याने चेन्नईसाठी २०१८, २०२१, २०२३ मध्ये आयपीएलचे विजेतेपद पटकावले आहे.

### कोहलीची विराट कामगीरी

विराट कोहलीने यंदाच्या आयपीएल हंगामात १५ सामने खेळले असून ६१.७५ च्या सरासरीने सर्वाधिक ७४१ धावा केल्या. या हंगामात त्याने पाच अर्धशतके आणि एक शतक झळकावले. त्याच्या याच कामगिरीमुळे त्याला या हंगामात ऑरेंज कॅप जिंकता आली.